## जाहिरात सन 2017-18

**सातारा जिल्हा परिषद जलस्वराज्य-२ पाणी व स्वच्छता विभाग**

**दुरध्वनी क्रमांक-०२१६२-२३६५६९**

# कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठीची जाहीरात

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक जस्वप्र -0214/प्रक्र 34/पापू 11 दि. 17.2.2014 अन्वये जलस्वराज्य २ कार्यक्रमासाठी पद निर्मीती करण्यात आलेली आहे. त्यानुसार सातारा जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागांच्या कार्यक्षेत्रातील तालुक्यासाठी "ग्रामलेखा समन्वयक" व "सल्लागार पाणी गुणवत्ता" ही पदे ११ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर, कंत्राटी पध्दतीने भरणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. पद भरतीचे स्थान, पदांची संख्या खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग कार्यक्षेत्रातील तालुके

| पद संकेतांक | कंत्राटी पदाचे नांव | पदांची संख्या | पदांचे आरक्षण | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सल्लागार (पाणी गुणवत्ता) | ३ | सर्वसाधारण - 2<br>अनुसूचित जमाती -1 | कोणत्याही शाखेची मान्यता प्राप्त् विदयापीठाची पदवी. रसायनशास्त्र विषयामधील पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल. | १ वर्ष<br>पाणी गुणवत्ता व स्वच्छता विषयातील कमीतकमी १ वर्ष अनुभव वर्ष | ८०००/- (रक्कम रुपये आठ हजार फक्त |
| २ | ग्रामलेखा समन्वयक | १ | सर्वसाधारण - 1 | बी.कॉम किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त् विदयापीठाची समतुल्य पदवी, | १ वर्ष<br>लेखाविषयक कमाकाजाचा 1 वर्षाचा अनुभव व टॅली 9.2 मधील डबल एन्ट्री सखोल ज्ञान | ८०००/- (रक्कम रुपये आठ हजार फक्त |

उपरोक्त पदांसाठी अर्जाचा नमूना, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय आर्थिक मोबदला व कामाचे स्वरुप, अटी व शर्ती निवड प्रक्रिया इत्यादीबाबतचा सविस्तर तपशील www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

इच्छुक उमेदवारांनी जाहिरातींचा व सुचनांचा बारकाइने अभ्यास करुन आपला अर्ज सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेसह **दिनांक- ०१/ ०३ /२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** सदस्य् सचिव तथा **उप मुख्य कार्यकारी अधिकारी** (पाणी व स्वच्छता विभाग), **विस्तारीत इमारत, तळमजला, सातारा जिल्हा परिषद, सातारा** यांचेकडे पोस्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावेत. विहीत वेळेनंतर /तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. उमेदवाराने अर्ज सादर करताना उप विभागीय स्तरावरील नेमणुकीसाठीच्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

**स्वाक्षरी/-XXX**
**सदस्य सचिव तथा**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(पाणी व स्वच्छता)
**जिल्हा परिषद** सातारा

**स्वाक्षरी/-XXX**
**अध्यक्ष निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

## जलस्वराज्य टप्पा 2 अंतर्गत कंत्राटी "सल्लागार पाणी गुणवत्ता" व "ग्रामलेखा समन्वयक" पदे

## उपविभागीय स्तरावरील नेमणुकीसाठी अटी व शर्ती

1. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीला बोलविणेचा हक्क अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे गृहीत धरु नये.

2. प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारणेत आलेले नाहीत, अशा उमेदवारांना मुलाखतीसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

3. कंत्राटी "ग्रामलेखा समन्वयक" व "सल्लागार पाणी गुणवत्ता" या पदाच्या भरती प्रक्रियेसाठी शैक्षणिक अर्हता व निकष पात्र उमेदवारांना बोलावून निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

4. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन वैध ठरलेल्या अर्जदारांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत, वेळ, दिनांक, पात्र निवडलेल्या उमेदवारांची यादी, निवड प्रक्रियेच्या सर्व सुचना www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. उमेदवारांना कोणत्याही सूचना थेट पत्रव्यवहार किंवा ई-मेल वा अन्य माध्यमातून दिल्या जाणार नाहीत. केवळ मुलाखतीसाठी पत्रव्यवहार केला जाईल.

5. सल्लागार पाणी गुणवत्ता शैक्षणिक अर्हता ही कोणत्याही शाखेची मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी असावी. रसायन शास्त्र विषयामधील पदवीधारकास प्राधान्य् दिले जाईल. उच्चतम अर्हता धारण करणा-या व पाणी गुणवत्ता व स्वच्छता क्षेत्रामधील एक वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

6. ग्रामलेखा समनव्यक या पदासाठी शैक्षणिक अर्हता हे बी.कॉम असून लेखाविषयक क्षेत्रातील एक वर्षाचा अनुभव तसेच टॅली 9.2 मधील डबल एन्ट्री (दुहेरी नोंद) चे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

7. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नवी मुंबई यांनी दि. 14 ऑक्टोबर, 2014 अन्वये दिलेले सुचनान्वये प्राप्त झालेल्या अर्जामधून, अनुभवाची अट पूर्ण करीत असलेले उमेदवार उपलब्ध् न झाल्यास व शैक्षणिकदृष्टया पात्र उमेदवार अन्यथा पात्र ठरलेस अनुभवाची अट विचारात न घेता (शिथील करुन) उमेदवारांची निवड करण्यात येईल.
**अर्जासोबत अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र जोडण्यात यावे.**

8. जिल्हा/तालुकास्तरावरील सल्लागार पाणी गुणवत्ता व ग्रामलेखा समन्वयक या पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, अर्थिक मोबदला, कामाचे स्वरुप, मानधन इत्यादी बाबींसाठी शासन निर्णय क्र. जस्वप्र-0114/प्रक्र 05/पापू 11 दि. 06.02.2014 व जस्वप्र-0214/प्रक्र34/पापू 11 दि. 17.02.2014 चे शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अवलोकन करावे.

9. सदरचे पद ग्रामीण पाणी पुरवठा उप विभागीय कार्यालयामध्ये तालुकास्तरावर तात्पुरते पद म्हणून कार्यक्रम कालावधीतपुरते कार्यरत राहील. कार्यक्रम कालावधी संपल्यानंतर सदरचे पद व्यपगत होईल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या नेमणुका करार संपल्यानंतर संपुष्टात येतील. कंत्राटी तत्वावर नेमलेल्या कर्मचा-यांना कंत्राटी सेवेच्याआधारे शासनाच्या नियमित सेवेत सामावून घेतले जाणार नाही.

10. कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वय मर्यादा 50 वर्षे राहील व किमान 18 वर्षे असेल तसेच सेवानिवृत्त सरकारी/निमसरकारी अधिकारी/कर्मचा-यांची कंत्राटी पदावर नियुक्ती करताना वयाची कमाल मर्यादा 65 वर्षे राहील. यास्तव सदर पदासाठी सेवानिवृत्त कर्मचारी फॉर्म भरु शकतात. वयाच्या पुराव्यासाठी अर्जासोबत 10 वी प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला साक्षांकित फोटो प्रत जोडणे आवश्यक आहे.

11. उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवासखर्च किंवा इतर कोणताही भत्ता शासनाकडून दिला जाणार नाही.

12. उमेदवारांना मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

13. सल्लागार पाणी गुणवत्ता या पदाच्या उमेदवाराला पणी गुणवत्ता व  स्वच्छता क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा.  तसेच ग्रामलेखा समन्वयक यांना लेखाविषयक व टॅली 9.2 मधील डबल एन्ट्रीचे सखोल ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे.

14. उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

15. शैक्षणिक अर्हतेच्या मार्कलिस्ट / प्रमाणपत्राच्या साक्षांकित फोटोप्रती अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

16. निवड प्रक्रियेसंबंधीची सर्व माहिती **www.zpsatara.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.  या प्रक्रियेमध्ये वेळोवेळी दिल्या जाणा-या सूचनांचे पालन करण्याची तसेच निवड प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

17. अनुसूचित जमातीचे व उमेदवारांनी त्यांचेकडील प्रांत / तहसिलदार यांचा जातीचा  दाखला अथवा जात वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतिची फोटोप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**18.  अर्जासोबत शैक्षणित अर्हता प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या आधारे तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करताना जात प्रमाणपत्र अथवा जातीचे वैधता प्रमाणपत्र साक्षाकिंत फोटोप्रती जोडणे बंधनकारक आहे.  तसेच मुळ अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.**

19. आरक्षित मागास प्रर्वगांना दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची प्रत मूळ कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

20.  सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत सादर करणेच्या अटीवर नियुक्ती दिली जाईल.

21. महाराष्ट्र शासन, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग शासन निर्णय क्र. सीबीसी-10/2008/प्रक्र.697/विजाभज-1 दिनांक 16 डिसेंबर, 2017 नुसार इतर मागास वर्ग व आवश्यक त्या प्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या गटामध्ये मोडत नसलेल्या उमेदवारांनी 2017-18 या आर्थिक वर्षात दिनांक 31.3.2018 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, मूळ कागदपत्रे पडताळणी वेळी सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

22. प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, क्षेत्रविषयक ज्ञान, अनुभव व इतर मुळ कागदपत्रे तसेच त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विहीत तारीख व वेळेत उपस्थित राहावे. उमेदवार विहीत तारखेस व वेळेवर उपस्थित न राहिल्यास शासन अथवा जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

23. कंत्राटी पध्दतीने पद भरताना पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल व त्यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमानुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल  व पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करणेत येईल.

**24. उमेदवाराचा अर्ज हा ए 4 आकाराच्या कागदावर 16 फॉंटमध्ये टंकलिखीत अथवा संगणीकृत केलेला असावा व अर्जासोबत अर्जामध्ये नमूद केलेली आवश्यक ती सर्व कागदपत्रांच्या सांक्षांकित फोटो प्रती जोडाव्यात.  परिपूर्ण व नमून्यातील अर्जच ग्राहय धरण्यात येतील.**

25. अर्जासाठी व प्रवेशपत्रासाठी स्वतंत्र (वेगवेगळे) लखोटे वापरण्यात यावेत.

**26.  मूळ फॉर्मसोबत प्रवेशपत्रासाठी रु.5/- चा टपाल तिकीट लावलेला कोरा लिफाफा जोडावा व सदर लिफाफयावर प्रेषक या ठिकाणी स्वत:चे नांव व पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसह सुवाच्छ अक्षरात लिहावा.  तसेच सदर को-या लिफाफयामध्ये प्रवेशपत्र ठेवताना त्यामध्ये आवश्यक ती माहिती (उदा. नांव, उमेदवाराची स्वाक्षरी व पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून) प्रवेशपत्र लिफाफयामध्ये ठेवण्यात यावे व तो अर्जासोबत अथवा अर्जासोबतच्या लखोटयात देण्यात यावे.**

27.  मूळ अर्जासाठी वापरण्यात येणा-या लखोटयावर उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचा उल्लेख "सल्लागार पाणी गुणवत्ता" अथवा "ग्रामलेखा समन्वयक" या पदासाठी अर्ज असा स्पष्ट उल्लेख करावा.

28. रिक्त पदांचे संख्येत बदल झाल्यास त्या प्रमाणात उमेदवारांची निवड करणेत येईल.

29. अर्ज संबंधित ठिकाणी **दि. 01/03/2018 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत** सदस्य सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग, विस्तारीत इमारत, तळमजला, जिल्हा परिषद, सातारा यांचे कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः अथवा पोष्टाव्दारे सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. पोस्टाव्दारे अर्ज सादर करताना होणा-या विलंबास संबंधित विभाग जबाबदार राहणार नाही. पोष्टातर्फे अथवा प्रत्यक्ष विहीत मूदतीच्या वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

30. अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत नमूद केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती, कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारावर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

31. कागदपत्र छाननी अंती पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेशपत्र पोष्टाने त्यांचे पत्रव्यवहाराचे पत्यावर पाठविण्यात येतील. तरीसुध्दा त्यांना ते मुलाखत दिनांकापूर्वी न मिळालेस दोन दिवस अगोदर ती सदस्य् सचिव तथा उप मुख्य् कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग, विस्तारीत इमारत, तळमजला, जिल्हा परिषद, सातारा यांचे कार्यालयात समक्ष देण्यात येतील.

32. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

33. जाहिरातीमधील काही बाबी विषयी शंका असल्यास त्यांनी सदस्य सचिव, तथा संबंधीत खातेप्रमुख जि.प.सातारा यांना कार्यालयीन दिवशी व वेळेत समक्ष भेटावे.

34. ही सर्व पदे जलस्वराज्य टप्पा क्र.2 या कार्यक्रमासाठी असून सदर पद भरती प्रक्रियेत बदल करणे, अंशत: बदल करणे, स्थगित करणे, रद्द करणे, पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, मुलाखत न घेणे अथवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**स्वाक्षरी/-XXXX**
**सदस्य सचिव तथा**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(पाणी व स्वच्छता)
**जिल्हा परिषद सातारा**

**स्वाक्षरी/-XXXX**
**अध्यक्ष निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

## सातारा जिल्हा परिषद, सातारा

## जलस्वराज्य टप्पा - 2 पाणी व स्वच्छता विभाग

## <u>कंत्राटी "ग्रामलेखा समन्वयक" व "सल्लागार पाणी गुणवत्ता" या पदासाठी</u>

## <u>अर्जाचा विहीत नमुना</u>

| कार्यालयीन उपयोगासाठी |
|---|
| अर्ज क्रमांक ------------------- |
| अर्ज प्राप्त् दिनांक ------------------ |

| पासपोर्ट साईज फोटो साक्षांकित |
|---|

प्रति,

मा.सदस्य सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी
पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद, सातारा

### <u>अ) वैयक्तिक माहिती</u>

| | |
|---|---|
| अर्ज करावयाच्या पदाचे नांव | |
| उमेदवाराचे संपूर्ण नांव (अडनांव प्रथम) | |
| जातीचा प्रवर्ग<br>(आवश्यक तेथे बरोबरची खूण करावी ) | अनु.जमाती \| सर्वसाधारण |
| धर्म , जात | |
| जातीचा दाखला<br>(साक्षांकित फोटोप्रत अर्जासोबत जोडावी)<br>(आवश्यक तेथे बरोबरची खूण करावी ) | आहे \| नाही |
| जातीचा दाखला असल्यास | प्रांत/तहसिलदार ---------------- यांचा<br>दिनांक - / / चा दाखला |
| जात वैधता प्रमाणपत्र<br>(आवश्यक तेथे बरोबरची खूण करावी )<br>(साक्षांकित फोटोप्रत अर्जासोबत जोडावी) | आहे \| नाही |
| जन्मतारीख | |
| वय ( दि. 15/02/2018 रोजीचे) | वर्षे महिने दिवस |
| लिंग (स्त्री / पुरुष) | |
| कायमचा पत्ता | |
| पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| संपर्कासाठी माहिती | मोबाईल नं. -<br>ई-मेल आयडी - |

## ब) शैक्षणिक माहिती

| शैक्षणिक पात्रता | मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ग्रॅज्यूएट / पदवी | | | | |
| पोस्ट ग्रुज्यूएट/ पदवीधर | | | | |
| डिप्लोमा | | | | |
| विशेष प्रशिक्षण, कॉम्प्युटर, टॅली, एम.एस.सी.आय.टी | | | | |
| इतर शिक्षण (प्रशिक्षण व कार्यशाळा यांचा समावेश असलेले) | | | | |

**क) कामाचा अनुभव**

| अ क्र | काम केलेली संस्था/ कार्यालयाचा पत्ता | धारण केलेले पद | कामाचा कालावधी | | कामाची जबाबदारी | वेतन (रुपये) | कामाचा एकुण कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**ड)** अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती खालील क्रमाने जोडाव्यात.

1. **शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र**
2. शाळा सोडल्याचा दाखला / माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(**10** वी), जन्माचा पुरावा
3. जातीचा दाखल (सक्षम अधिका-याचा दाखला)
4. अनुभवाचे प्रमाणपत्र
5. मागास वर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र असल्यास
6. **-----------------**
7. **------------------**

# प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो / करते की, आपले कार्यालयातील सल्लागार पाणी गुणवत्ता या पदाची जाहिरात काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहितरातीतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच अर्जामध्ये दिलेली माहिती खरी असून जर वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझी या पदासाठी उमेदवारी रद्द होईल. याबद्दल निवड समिती/ नियुक्त् अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहील.

ठिकाण - आपला/आपली विश्वासू

दिनांक - अर्जदाराची स्वाक्षरी/-

**जलस्वराज्य् टप्पा 2, पाणी व स्वच्छता विभाग,**
**जिल्हा परिषद, सातारा**

**<u>कंत्राटी "ग्रामलेखा समन्वयक" व "सल्लागार पाणी गुणवत्ता"</u> या पदासाठी प्रवेशपत्र / मुलाखतपत्र**

## <u>प्रवेशपत्र</u>

| |
|---|
| साक्षांकीत पासपोर्ट<br>आकाराचा फोटो<br>येथे चिटकटावा |

**श्री/ श्रीमती ------------------------------------------------------- यांची कंत्राटी "सल्लागार पाणी गुणवत्ता" अथवा "ग्रामलेखा समन्वयक" या पदासाठी छत्रपती शिवाजी सभागृह, जिल्हा परिषद, सातारा, चौथा मजला येथे**
**दिनांक / /2018 रोजी सकाळी 10.00 वाजता मुलाखत ठेवण्यात आली आहे. सदर मुलाखतीसाठी तुम्ही शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार अनुसूचित जमाती/ सर्वसाधारण या जात प्रर्वगासाठी मुळ कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून पात्र ठरला आहात. तरी तुम्ही उपरोक्त् ठिकाणी विहीत दिनांकास व वेळेस मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आहे. मुलाखतीसाठी येताना सदर प्रवेशपत्र आवश्यक आहे.**

**स्थळ : सातारा**

**दिनांक : / /2018**

**सदस्य् सचिव**
**तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**(पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा परिषद, सातारा**

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**टिप - सदरचे प्रवेशपत्र उमेदवाराने डाऊनलोड करुन घ्यावे.**